सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

RNI. NO. MAHBIL /25/A0192

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३२८ | शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५३००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १४१५०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ ११७५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २४००/- |

भाव प्रती १० ग्राम

## आजचे अभीष्टचिंतन




श्री. वरूण पाटील
उपाध्यक्ष : जयनील फाउंडेशन


श्री. विजय विसावे
अमळनेर


श्री. योगेश महाजन
कृषी उत्पन्न बाजार समिती


श्री. दत्ता नाईक
अमळनेर


श्री. शामकांत पाटील
अमळनेर


श्री. आबा साळी
अमळनेर


श्री. अजय विसावे
शिक्षक


श्री. राहुल संदानशिव
अमळनेर


श्री. विनोद पारख
अमळनेर


श्री. शैलेंद्रसिंग सोलंकी
अमळनेर





अमळनेर : आंतरराष्ट्रीय संघटना व्हॉईस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. डिगंबर महाले यांचा सत्कार करताना बन्सीलाल भागवत, अशोक पाटील, गौतम मोरे, प्रा. अशोक पवार, दयाराम पाटील, रियाज मौलाना, अजय भामरे, भिमराव महाजन, शंकर बैसाणे आदी. दुसऱ्या छायाचित्रात सत्काराप्रसंगी उपस्थित विविध संघटनेचे पदाधिकारी. (छायाचित्र : मयूर चौधरी)

### 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष

# डॉ. डिगंबर महाले यांचा भव्य सत्कार

## विविध सामाजिक, सांस्कृतिक व पुरोगामी संघटनांचा पुढाकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय स्तरासह ७४ देशांमध्ये कार्यरत असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकार संघटनेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी अमळनेरचे ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले यांची निवड झाल्याबद्दल शहरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक व पुरोगामी संघटनांच्या वतीने बुधवारी (दि. १९) रोजी सायंकाळी विठ्ठलनगरातील अभ्यासिका, प्रा. अशोक पवार यांच्या निवासस्थानी भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बन्सीलाल भागवत पाटील होते. प्रारंभी महात्मा फुले गीताचे गायन करण्यात आले. त्यानंतर महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. पत्रकारिता तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे डॉ. महाले यांची 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने अमळनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. कार्यक्रमाप्रसंगी अनेकांनी मनोगत्य व्यक्त केली तसेच त्यांच्या या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्कार सोहळ्याचे आयोजन युवा कल्याण प्रतिष्ठान, मराठा सेवा संघ, बहुजन समाज पार्टी, मौर्य क्रांती संघ महाराष्ट्र राज्य, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्र सेवा दल, महिला पतंजली योग समिती महाराष्ट्र पूर्व, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, राष्ट्रीय कला मंच, पुरोगामी क्रांती दल तसेच अल्लामा फजले हक खैराबादी स्टडी सेंटर ॲण्ड पब्लिक लायब्ररी, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी अशोक पाटील, गौतम मोरे, रियाज मौलाना, प्रा. लीलाधर पाटील, रणजित शिंदे, प्रा. अशोक पवार व अजय भामरे आदींनी मनोगतातून डॉ. महाले यांच्या कार्याचा गौरव केला. डॉ. महाले यांनी सत्काराला उत्तर दिले. अध्यक्षीय भाषण बन्सीलाल पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन डी. ए. पाटील यांनी केले.

यावेळी सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, हितचिंतक आणि डॉ. महाले यांचे मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. महाले यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.


सत्काराला उत्तर देताना डॉ. महाले.


### दै. ग्लोबल महातेजचा दणका!

# अखेर रस्त्याची डागडुजी

## डांबरीकरण करून खड्डे बुजविले मात्र अजूनही काही भाग शिल्लक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : चोपडा रस्त्यावरील पैलाड ते श्री मंगळग्रह मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था 'दै. ग्लोबल महातेज'ने वृत्ताद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर अखेर रस्त्याच्या डागडुजीला सुरुवात झाली आहे. गुरुवारी या मार्गावरील अनेक खड्डे डांबरीकरण करून बुजविण्यात आले. त्यामुळे वाहनधारक व नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.


चोपडा रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

स्मशानभूमी ते श्री मंगळग्रह मंदिर मार्ग धोकादायक

■ पावसात खड्ड्यांचे चिखलात रूपांतर; वाहनधारकांची कसरत

■ रात्री अपघातांचा धोका; नाल्याला कठडे नसल्याने परिस्थिती गंभीर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरातील चोपडा रस्त्यावरील स्मशानभूमीपासून श्री मंगळग्रह मंदिरापर्यंतच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खड्डे, चिखल आणि उखडलेल्या रस्त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. शहरातील हा महत्त्वाचा

महिना सुरू असल्याने पुढे श्री वर्णेश्वर महादेव मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांचीही मोठी गर्दी वाढली आहे. अशा परिस्थितीत रस्त्याची अवस्था दिवसभरात वावरणाऱ्या वाहनांमुळे त्यांच्या उडणाऱ्या धुळीचा त्रास दुचाकीचालकास व पायी चालणाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होतो. रस्त्याची दुरवस्था

आणि त्यांचा अंदाज रात्री येत नसल्याने दुचाकीस्वार तसेच चारचाकी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते.

अपघातांची टांगती तलवार

रस्त्याच्या काही भागालगत असलेल्या नाल्याला सुरक्षात्मक कठडे नसल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. रात्रीच्या

"चोपडा रस्त्यावरील स्मशानभूमीलगत काही दिवसांपूर्वी माती व मुरुमाच्या सहाय्याने खड्डे भरण्यात आले होते. तसेच दोन-चार दिवस पावसाचे वातावरण निवळल्यानंतर त्या ठिकाणी डांबराच्या सहाय्याने खड्डे भरण्याबाबत मी कंत्राटदाराला सांगतो. नाल्यावरील उघड्या व धोकादायक सळयांचीही दुरुस्ती करण्यात येईल.
– मयूर भदाणे, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर.

पैलाड ते मंगळग्रह मंदिर हा शहरातील महत्त्वाचा मार्ग असून, या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. खड्डे, चिखल आणि उखडलेल्या रस्त्यामुळे वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत होती. विशेषतः पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघाताचा धोका वाढला होता. खड्ड्यांमुळे या रस्त्यावर नेहमीच लहान मोठे अपघात होतात. रात्रीच्या अंधारात अपघातांचे प्रमाण वाढते. याबाबत 'दै.ग्लोबल महातेज'ने 'चोपडा रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य' या शीर्षकाखाली सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते.

**डागडुजी झाली, मात्र काही भाग अजूनही शिल्लक**

वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेत रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले. काही ठिकाणी डांबरीकरण करण्यात आले असले, तरी रस्त्याचा काही भाग अद्याप दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे संपूर्ण मार्गाची पाहणी करून उर्वरित खड्डेही बुजवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.


अमळनेर : शहरातील अमळनेर चोपडा रस्त्यावरील पैलाड ते स्मशानभूमीपर्यंत डांबरीकरण करून खड्डे बुजविलेली रस्त्याची एक बाजू. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

**दीर्घकाळ टिकणारी दुरुस्ती हवी**

दरवर्षी पावसाळ्यात खड्डे पडणे आणि त्यानंतर तात्पुरती डागडुजी करणे, हा प्रकार थांबवून रस्त्याची दर्जेदार व कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच नाल्यालगत सुरक्षात्मक कठडे उभारण्याचीही मागणी कायम आहे. वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासनाने दखल घेऊन डागडुजी केली, ही चांगली बाब आहे. मात्र, डागडुजी तकलादू ठरू नये. डागडुजीचा किमान एक तरी वाढदिवस साजरा होईपर्यंत रस्ता टिकावा, अशी मिश्कील प्रतिक्रिया देत नागरिकांनी कायमस्वरूपी दर्जेदार कामाची अपेक्षा व्यक्त केली.

# मोतीबिंदू शिबिरातील ५० रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पनवेलला रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मंगळ ग्रह सेवा संस्था व शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोतीबिंदू तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात १८६ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी ८५ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले.

शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या रुग्णांना दोन टप्प्यांत पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलमध्ये पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार गुरुवारी सकाळी ९ वाजता ५० रुग्णांना स्वतंत्र वाहनाने पनवेलकडे रवाना करण्यात आले. मंगळ ग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्तांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवून रुग्णांना निरोप देण्यात आला.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, कैलास महाजन तसेच सेवेकरी उपस्थित होते. उर्वरित ३५ रुग्णांना आज शुक्रवार दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता मंदिरातून स्वतंत्र वाहनाने पनवेल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात येणार आहे.



अमळनेर : मंगळग्रह मंदिर येथून पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना हिरवी झेंडी दाखवून रवाना करताना मंगळ ग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी व सेवेकरी

आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देणारा मंगळ ग्रह सेवा संस्था व शंकरा आय हॉस्पिटलचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

संपादकीय

# कोट्यवधी प्रवासी आणि अशुद्ध पाणी

महाराष्ट्रात अन्न आणि औषध प्रशासन विभागाने भेसळीविरोधात मोठी मोहीम सुरू केलेली आहे. अर्थातच ही मोहीम केवळ भेसळीपुरती मर्यादित राहिलेली नाही. तर एकूणच अन्नपदार्थांच्या दर्जाबाबतही विशेष दक्षता घेणारी आणि जनजागृती घडवून आणणारी मोहीम ठरते आहे. विशेष म्हणजे ही मोहीम सुरू झाली असतानाच केंद्र सरकार, कर्नाटक सरकार यांनीदेखील भेसळीसंदर्भात काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. त्यातही उत्तर भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त पनीर विकले जाते. त्याचा रोजचा खप हा दीडशे ते दोनशे टनापर्यंत आहे. म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणावर शरीराला घातक असलेले पनीर खुलेआमपणे विकले जात होते. विशेष म्हणजे एकूणच देशभरातील शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, औषधालय, हॉटेल्स, वेगवेगळ्या कारखान्यांमध्ये असणारे कँटिन्स, शाळांमधून वितरित होणारा पोषण आहार, एवढेच नव्हे तर देशात ज्या रेल्वेचे सर्वाधिक मोठे नेटवर्क आहे त्या रेल्वे स्थानकांवरच्या कँटिन्स आणि प्लॅटफॉर्मवरच्या स्टॉल्सवरही खाद्यपदार्थांच्याबाबतीत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेष लक्ष दिले जाते आहे. त्यातही रेल्वे स्थानकांवरच्या फ्रिजमधून वितरित होणारे थंड पाणी, याबाबतीतही आता बऱ्याच गोष्टी उघड होऊ लागल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे केंद्र सरकारच्या महालेखापालांनीच आपल्या अहवालामध्ये यासंदर्भात गंभीर स्वरूपाचे आक्षेप नोंदवले आहेत. दीड वर्षांपूर्वी देशभरातल्या रेल्वे स्थानकांवरच्या पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासले गेले. ज्यामध्ये ५१२ स्थानकांपैकी ४५८ स्थानकांवर पिण्याचं पाणी आणि इतर सुविधांचीही कमतरता असल्याचा ठपका ठेवला गेला. वॉटर कुलरमधून दिल्या जाणाऱ्या पाण्यामध्ये ई-कोलाय हे जीवाणू आढळून आले. ज्याचा आरोग्यावर विपरित परिणाम होण्याची मोठी शक्यता असते. म्हणजेच रेल्वे स्थानकांवरच्या पाण्याच्या शुद्धतेतदेखील गंभीर स्वरूपाच्या त्रुटी असल्याचे स्पष्ट होते. याचा अर्थ खाद्यपदार्थांमधल्या भेसळीबरोबरच अशुद्ध पिण्याचे पाणी तितक्याच मोठ्या प्रमाणावर आणि उघडपणे वितरित केले जाते. ज्यावेळेला केंद्र सरकारच्याच महालेखापालांना आपल्या अहवालामध्ये याची दखल घ्यावी लागते. त्याअर्थी रेल्वे स्थानकांवरच्या पिण्याच्या पाण्यापासून ते खाद्यपदार्थांच्या दर्जाबाबत लक्ष ठेवणारी कोणतीच सक्षम यंत्रणा अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट होते.

रेल्वेस्थानके, रेल्वे गाड्या, रेल्वे कँटिन्स, इथल्या अन्नपदार्थ आणि पिण्याच्या पाण्याबाबत सर्वाधिक दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे महालेखापालांच्या या अहवालामध्ये महाराष्ट्रातली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, कल्याण, भिवंडी रोड, लोणावळा, या स्थानकांवर अशुद्ध पाणी मिळत असल्याचे सांगितले गेले आहे. देशभरात रेल्वेची दक्षिण, मध्य, पूर्व आणि पश्चिम असे विभाग आहेत आणि या तीन महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर पिण्याच्या पाण्यातील गंभीर त्रुटी आढळून आल्या. आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकांवर रोज काही लाख प्रवासी ये-जा करतात. त्यातले किमान दहा-पंधरा टक्के लोक निश्चितच तिथल्या पाण्याचा वापर करत असतील. मुंबई हे देशातील दर दिवशी सर्वाधिक प्रवासी घेऊन जाणारे महानगर ठरते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या स्थानकावरच जर पाणी किंवा खाद्यपदार्थांच्या दर्जाबाबत दुर्लक्ष होत असेल तर ते आणखीनच धक्कादायक ठरते. एकूणच देशाचा विचार केला तर रोज अडीच ते तीन कोटी लोक रेल्वेने प्रवास करत असतात. जवळपास चौदा हजार गाड्या देशभरात धावत असतात. याचा अर्थ केवळ रेल्वे स्थानकांचा जरी विचार केला तरी काही कोटी लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. रेल्वेने खाद्यपदार्थांच्या सुविधांमध्ये दर्जा राहावा म्हणून त्याचे खासगीकरण करायला सुरूवात केली आणि आयआरसीटीसीकडे यातला बराचसा कारभार सोपवला. परंतु अजूनही खाद्यपदार्थांच्या दर्जाबाबत लोकांच्या तक्रारी येत असतात. शेकडो गाड्यांना असलेल्या पँट्री कारमधली अवस्था फार काही समाधानकारक नसते. तिथली अस्वच्छता आणि पदार्थांच्या दर्जाबाबतही लोक फारसे समाधानी नसतात.

जर रेल्वे स्थानकांवरच्या कुलरमधल्या पाण्याबाबतच ही परिस्थिती असेल तर प्रत्यक्ष ज्या पँट्रीकारमधून अन्नपदार्थ शिजवले जातात तिथले पाणीसुद्धा शुद्ध असेल की नाही याबद्दल शंका वाटू लागते. स्वाभाविकपणे प्रवासी बंद बाटल्यांमधले पाणी विकत घेतात. रेल्वेनेसुद्धा रेल नीर नावाने बाटलीबंद पाण्याची विक्री सुरू केलेली आहे. केंद्राच्या महालेखापालांच्या अहवालामध्ये पाण्याच्या शुद्धतेबाबत दिला गेलेला इशारा हा संपूर्ण रेल्वे प्रशासनासाठी मिळालेली एक गंभीर सूचना ठरते. दुर्दैवाचा भाग असा आहे की, रेल्वे किंवा बसस्थानके, हॉटेल्स या ठिकाणी खूप शुद्ध पाणी मिळेल याची फार अपेक्षाही ठेवता येत नाही. कारण आज महाराष्ट्रासारख्या राज्यातच राज्य सरकारकडूनच पुरेसे शुद्ध पाणी पुरवले जाऊ शकत नाही. जवळपास निम्मा महाराष्ट्र हा दुष्काळग्रस्त असतो. आणि जेवढे काही पाणी मिळते ते शंभर टक्के शुद्ध असेलच याची खात्री देता येत नाही. मुंबईसारख्या महानगरात दीड-दोनशे किलोमीटरवरून पाणी पाईपलाईनद्वारे आणले जाते. त्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करून घराघरांत पोहोचवण्याचा प्रयत्न होतो तरीदेखील मुंबईतल्या झोपडपट्ट्यांपर्यंत हे शुद्ध पाणी पोहोचू शकत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. एवढेच नव्हे तर राज्याच्या ग्रामीण आणि आदिवासी भागात जवळपास चार ते पाच दिवसांनी एकदा नळाद्वारे पाणी पुरवले जाते. घरामध्ये साठवून ठेवलेले पाणी चार चार-पाच पाच दिवस वापरावे लागते अशावेळी ते पाणी शुद्ध राहत असेल याची कोणतीही खात्री देता येत नाही. आदिवासी भागांमधल्या आश्रमशाळांची परिस्थितीसुद्धा अतिशय वाईट स्वरूपाची आहे. तुकाराम मुंढे यांच्या मोहिमेने अशा सगळ्या भेसळसम्राटांचे धाबे दणाणलेले आहे. परंतु निर्भेळ खाद्यपदार्थ किंवा पोषक दर्जायुक्त खाद्यपदार्थ, पाणी उपलब्ध होण्याकरिता राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरच फार मोठ्या सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. लोकांच्या रोजच्या जेवणा-खाण्याच्या पदार्थांबाबतचा हा निष्काळजीपणा जीवघेणेपणाच म्हणावा लागतो.

# वाहतूक नियमभंग करणाऱ्या ५० वाहनांवर कारवाई; ५४ हजार रुपयांचा दंड वसूल...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासह अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांनी शहराबाहेर तसेच शहरातील विविध ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. या कारवाईत सुमारे ८० ते ९० वाहनांची तपासणी करण्यात आली असून, मोटार वाहन कायद्याचा भंग करणाऱ्या ५० वाहनचालकांवर कारवाई करून एकूण ५४ हजार ७०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी 'शून्य अपघात' संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना डीवायएसपी विनायक कोते व पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना दिल्या होत्या. त्यानुसार वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल संजय बोरसे, रवींद्र बोरसे व संजय सोनवणे यांनी गलवाडे रस्ता, नाट्यगृह, भागवत रस्ता, धुळे रस्ता आदी ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली.

कारवाईदरम्यान ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्या ६ वाहनचालकांवर प्रत्येकी एक हजार रुपयांप्रमाणे ६ हजार रुपये, वाहन परवान्याशिवाय वाहन चालविणाऱ्या दोघांवर एक हजार रुपये, तुटलेल्या नंबर प्लेट असलेल्या दोन वाहनांवर एक हजार रुपये, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणाऱ्या ५ वाहनचालकांवर ५ हजार रुपये तसेच पोलिसांच्या सूचनेनंतरही नियमांचे पालन न करणाऱ्या एका वाहनचालकावर ५०० रुपयांचा दंड करण्यात आला. बिनाहेल्मेट वाहन चालविणाऱ्या ५ जणांवर ५ हजार रुपये, सार्वजनिक ठिकाणी अयोग्य पद्धतीने पार्किंग करणाऱ्या १९ वाहनांवर १२ हजार रुपये, अवैध वाहन परवाना असलेल्या ४ चालकांवर २० हजार रुपये, जादा प्रवासी वाहतूक करणाऱ्या एका वाहनावर ५०० रुपये, काळी फ्रेम लावणाऱ्या एका वाहनचालकावर ५०० रुपये, रिफ्लेक्टर नसलेल्या ३ वाहनांवर ३ हजार रुपये तसेच कर्कश आवाजाचे सायलेन्सर लावलेल्या बुलेटचालकावर ५०० रुपयांचा दंड करण्यात आला. या कारवाईत एकूण ५० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून संबंधित प्रकरणांचा अहवाल न्यायालयात पाठविण्यात आला आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात अशाच प्रकारची कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



# भल्या पहाटे अवैध मुरूम वाहतूक करणारे डंपर पकडले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अवैध मुरूम वाहतूक करणारे डंपरवर भल्या पहाटे महसूल पथकाने कारवाई केल्याची घटना २० रोजी भगवा चौकात घडली.

प्रांताधिकारी मयुर भंगाळे यांच्या मार्गदर्शनाखाली भगवा चौक अमळनेर येथे एक अनधिकृत गौण खनिज मुरूम वाहतूक करणारे डंपर आढळल्याने ते पकडण्यात आले. सदर डंपर तहसिल कार्यालय अमळनेर येथे जमा करण्यात आले.दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. पथकात सी यु पाटील (नायब तहसीलदार) पी. एस. पाटील (मंडळ अधिकारी वावडे) संदीप माळी (ग्राम महसूल अधिकारी मांडळ), बिक्रम कदम (ग्राम महसूल अधिकारी शहापुर), अमोल पाटील (ग्राम महसूल अधिकारी कुरे खुर्द ), विकेश भोई (ग्राम महसूल अधिकारी बाम्हने), एम आर पाटील (ग्राम महसूल अधिकारी जैतपीर) यांचा समावेश होता.

# अंधाराचा गैरफायदा घेत मारहाण; सहा जणांवर गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अंधाराचा फायदा घेत एकाला मारहाण करण्याच्या नादात दुसऱ्यालाच बेदम मारहाण करून बेशुद्ध केल्याची घटना तालुक्यातील मंगरूळ येथे १७ रोजी रात्री साडे बारा वाजेच्या सुमारास घडली. सहा जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील मंगरूळ येथे कानबाईची मिरवणूक होती. त्यावेळी काही तरुणांनी श्रीकृष्ण चौकात एकाला मारहाण करून तो बेशुद्ध अवस्थेत पडला असल्याची माहिती मिळाली. मिरवणुकीत लाईट बंद केल्यावरून वाद झाले. काहींनी वाळू फेकली. यात अंधाराचा गैरफायदा घेत काहींनी नितीन सुरेश कुंभार याला लाथा बुयांनी बेदम मारहाण केली. यात तो जागीच बेशुद्ध पडला होता. विक्की संजय पाटील याने जखमी तरुणाचे वडील सुरेश सजन कुंभार याना जाऊन सांगितले की, तुमचा मुलगा बेशुद्ध पडला आहे. त्यावेळी सुरेश कुंभार यांनी माझ्या मुलाला का मारले म्हणून विचारपूस केली असता आम्हाला दुसऱ्याला मारायचे होते पण अंधारात याला मार लागला असे सांगितले. सुरेश कुंभार यांनी अमळनेर पोलीस स्टेशनला राहुल शरद पाटील, शेखर मनोहर पाटील, रवींद्र हिलाल पाटील यांचा मुलगा, संतोष बापू पाटील यांचा मुलगा, वसंत लुकडू पाटील यांचा मुलगा, विक्की बाळू पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# उपवर्गीकरणाविरोधात अमळनेरमध्ये वज्रमूठ; तालुक्यात भव्यमोर्चाचा निर्धार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अनुसूचित जाती संवर्गाच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शवण्यासाठी शहरातील साने गुरुजी विद्यालयात १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता अनुसूचित जाती संवर्गातील विविध समाज घटकांची सहविचार सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या बैठकीत उपवर्गीकरणाविरोधात एकजुटीने लढा उभारण्याचा आणि तालुक्यात भव्य मोर्चा काढण्याचा ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला.

येत्या पुढील महिन्यात जिल्हास्तरावर उपवर्गीकरण विरोधी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर, पूर्वतयारी म्हणून अमळनेर तालुक्यात सर्वप्रथम उपवर्गीकरण विरोधी मोर्चा काढण्याचे बैठकीत ठरवण्यात आले. चर्मकार महासंघाचे ज्येष्ठ नेते भानुदास विसावे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भविष्यात येणाऱ्या असंवैधानिक संकटाला परतवून लावण्यासाठी सर्व समाज घटकांनी एकत्र येऊन वज्रमूठ आवळण्याची गरज आहे.

या सहविचार सभेला बौद्ध, चांभार, होलार, मातंग व मेहतर समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व समाज बांधवांनी या लढ्यात खांद्याला खांदा लावून सहभागी होण्याची आणि मोर्चा यशस्वी करण्याची शपथ घेतली. उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने तालुक्यातील सर्व अनुसूचित जाती घटकांना या मोर्चात मोठ्या संख्येने सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी चर्मकार महासंघाचे भानुदास विसावे, नरेश कांबळे, विजय बिऱ्हाडे, आरपीआयचे यशवंत बैसाने, ॲड. प्रशांत संदानशिव, सनी गायकवाड,अरुण मोरे,सोमचंद संदानशिव, हृदयनाथ मोरे, अतुल डोळस, बापूराव संदानशिव, योगराज संदानशिव, अर्जुन संदानशिव, अरुण घोलप, गौतम मोरे, अशोक बिऱ्हाडे, सुभाष आगळे, भगवान संदानशिव, अनिकेत ब्रम्हे,अशोक सैंदाने, दगडू सोनवणे,राहुल वाडेकर, मच्छिंद्र साळुंखे, राजेंद्र सैंदाने, गौतम शिरसाठ , उत्तर वानखेडे यांच्यासह ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्ते व समाज बांधव उपस्थित होते.



**अमळनेर : जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त अमळनेर शहरातील फोटोग्राफर्सचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करताना रवि ज्वेलर्सचे संचालक रवि वर्मा व निखिल वर्मा**

# मानवता दिनी गरजूंना अन्नकिट; फोटोग्राफर्सचा सन्मान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक मानवता दिनाचे औचित्य साधून रवि ज्वेलर्सतर्फे शहरातील गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या अन्नकिटचे वाटप करण्यात आले. तसेच जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त अमळनेर शहरातील फोटोग्राफर्सचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.



***जागतिक मानवता दिनाचे औचित्य साधून दि. १९ बुधवारी रोजी गरजू व्यक्तींना रवि ज्वेलर्सतर्फे अन्नकिटचे वाटप करताना.***

मानवसेवा हीच खरी समाजसेवा या भावनेतून रवि ज्वेलर्सने हा उपक्रम राबविला. गरजू कुटुंबांना अन्नकिटचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी कॅमेऱ्याच्या माध्यमातून समाजातील विविध क्षण, संस्कृती आणि आठवणी जतन करणाऱ्या फोटोग्राफर्सचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच पूरग्रस्त फोटोग्राफर्स असोसिएशनला मदत म्हणून आर्थिक योगदान देण्यात आले. संकटाच्या काळात फोटोग्राफर बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याचा हा उपक्रम असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मानवसेवा आणि फोटोग्राफी क्षेत्रातील योगदानाचा गौरव अशा दोन्ही उपक्रमांमुळे रवि ज्वेलर्सच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. फोटोग्राफर्सनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमास शहरातील फोटोग्राफर्स, नागरिक तसेच रवि ज्वेलर्सचे रवि वर्मा व निखिल वर्मा बंधू उपस्थित होते. भविष्यातही विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा संकल्प रवि ज्वेलर्सतर्फे व्यक्त करण्यात आला

# अमळनेरकरांचा अंत बघू नका; दोन-चार दिवसांत पाणी प्रश्न न सुटल्यास पालिकेवर मोर्चा धडकणार

## टेंडरचा हव्यास, सोशल मीडियावर नौटंकीसह पाणी वाटपातील भेदभाव...

## पाणी द्यायला पालिका अपयशी; रील्स बनवण्यात मात्र पुढे! ढिसाळ कारभारावर ठाकूरांचा घणाघात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : ३१ जुलै रोजी आलेल्या पुरात केवळ मोजून दोन ते तीन पाईप वाहून गेले होते. ते तात्पुरते जोडून नागरिकांना तत्काळ दिलासा देणे सहज शक्य होते. मात्र, टेंडरचा हव्यास, मलिदा लाटण्याची वृत्ती आणि पैसा कुठून व कसा काढता येईल या दृष्टिकोनातून काम जाणीवपूर्वक लांबवण्यात आले. अमळनेरकरांना मूलभूत आणि जीवनावश्यक अशा पाण्यापासून वंचित ठेवणे हा पालिकेचा अक्षम्य दळभद्रीपणा आहे. नगराध्यक्ष, पाणीपुरवठा सभापती, पाणीपुरवठा अभियंता आणि पालिका प्रशासनाने अमळनेरकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये; येत्या दोन ते चार दिवसांत शहराचा पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास पालिकेवर थेट जनमोर्चा धडकवला जाईल, असा सज्जड इशारा सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र (जितू) ठाकूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

अमळनेर शहरातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नागरिक एक-एक थेंबासाठी तडफडत आहे. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, अमळनेर शहरात २७ ते २८ जुलै दरम्यान आलेले पाणी त्यानंतर थेट रखडले असून आज २० ऑगस्ट उजाडला तरी जनता पाण्यासाठी वणवण करत आहे. असे असताना पालिका पदाधिकारी आणि प्रशासन सोशल मीडियावर फोटो, व्हिडिओ आणि रील्स अपलोड करून बोटं दाखवत 'काम युद्धपातळीवर सुरू आहे' अशी स्वतःचीच फुशारकी मारून लोकांची दिशाभूल करत आहेत. नागरिकांची अशी उघड्या डोळ्यांनी टिंगलटवाळी करताना यांना लाजा कशा वाटत नाहीत? कौडीची अक्कल नसताना सोशल मीडियावर नौटंकी सुरू आहे. जर खरंच युद्धपातळीवर काम करायचे होते, तर तिथे २५-३० मजुरांऐवजी १०० मजूर लावून दिवस-रात्र एक करत अवघ्या आठ दिवसांत पाईपलाईन का जोडली गेली नाही? नागरिकांच्या पैशांवर चालणाऱ्या पालिकेला अतिरिक्त मजूर लावून काम उरकण्याचे गांभीर्य का वाटले नाही? लाखो सोडून करोडो रुपये लागले असते तर नागरीकांनी नगरपरिषदेला पैशांचा हिशोब मुळीच विचारला नसता असा संतप्त सवाल ठाकूर यांनी केला आहे.

**पाणी वाटपात उघड, उघड पक्षपात**

बायपास लाईनवरून शहरात सुरू असलेल्या पाणीवाटपातील पक्षपातावर ताशेरे ओढताना ठाकूर म्हणाले, काही भागात दररोज १५ मिनिटे पाणी मिळते, तर बहुतांश सर्वसामान्य भागांत गेल्या १५-२० दिवसांत पाण्याचा एक थेंबही आलेला नाही. रोज पाणी मिळणारे काय पालिकेचे जावई लागतात का आणि बाकीचे अमळनेरकर तुमचे दुष्मन आहेत का? पाईपलाईन जोडल्यानंतरही टाक्या भरून रोटेशन पद्धतीने पाणी देण्यास काही भागात २२ दिवस, काहींना २५, २८ दिवस तर काहींना महिना उलटून जाईल.

**पालिकेने अमळनेरकरांना टँकरद्वारे मोफत पाणी का दिले नाही?**

शहराला पाणी पुरवणे ही पालिकेची मूलभूत आणि नैतिक जबाबदारी असताना, लाखो-करोडोंच्या कामांची टेंडर काढणाऱ्या पालिकेने टँकर अधिग्रहीत करून मोफत पाणी का पुरवले नाही? पालिकेच्या नाकर्तेपणामुळेच आज 'जयनील फाउंडेशन'सारख्या संस्थेला पुढे येऊन स्वतःच्या खर्चाने टँकरद्वारे नागरिकांची तहान भागवावी लागत आहे, याबद्दल फाउंडेशनचे आभार मानले पाहिजेत.

**एक रुपयाही पाणीपट्टी भरू नका; वसुलीला आल्यास जाब विचारा!**

दरवर्षी १८०० रुपये पाणीपट्टी वसूल करताना पालिका प्रशासन नागरिकांकडून सक्तीने व्याजही उकळते. मात्र हक्काचे पाणी देण्याच्या वेळी पालिका सपशेल अपयशी ठरली आहे. त्यामुळे जोपर्यंत अमळनेरकरांना सुरळीत आणि पुरेसे पाणी मिळत नाही, तोपर्यंत नागरिकांनी पालिकेची कोणतीही पाणीपट्टी भरू नये आणि पालिकेचे पथक वसुलीसाठी आल्यास त्यांना आधी पाण्याचा जाब विचारावा, असे आवाहन ठाकूर यांनी शहरवासीयांना केले आहे.

**कोणतेही राजकारण नाही सहकार्यच..**

पाण्याच्या गंभीर प्रश्नावर आम्ही कोणतेही राजकारण करत नाही, उलट विरोधकही या कामात सहकार्यच करत आहेत. अमळनेरची जनता अत्यंत संयमी आणि सहनशील आहे, पण त्यांच्या या सहनशीलतेला कोणी दुबळेपणा समजू नये. सतत नागरिकांचे फोन येत असल्याने हा जाब विचारावा लागत आहे. येत्या दोन ते चार दिवसांत शहराला पाणी मिळाले नाही, तर सर्व जनतेला सोबत घेऊन पालिकेवर मोर्चा काढला जाईल.

> *पाईपलाईनचे काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, चार पाण्याच्या टाक्यांचा पाणीपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे वेगवेगळ्या भागांत बायपास टाकून कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या सर्व भागांत पाणी पोहोचत आहे; मात्र काही भागांत कमी दाबाने पाणी जात असून, शेवटच्या भागापर्यंत पाणी पोहोचत नाही. त्या भागासाठीही पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत पाईपलाईनचे काम पूर्ण होऊन पाणीपुरवठा सुरळीत होईल.*
>
> ***– गणेश शिंदे, मुख्याधिकारी***

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# रेलवे में पटरियां मरम्मत की, रोज ८ घंटे की पढ़ाई, अब प्रल्हाद मीणा बने आयपीएस अफसर



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सफलता किसी की मोहताज नहीं होती, बस मन में दृढ़ संकल्प और मेहनत करने की इच्छा होनी चाहिए। इस बात को सच साबित कर दिखाया है राजस्थान के दौसा जिले के एक छोटे से गांव में जन्मे प्रल्हाद मीणा ने। एक समय रेलवे में गैंगमैन के रूप में पटरियों की मरम्मत करने वाले प्रल्हाद आज भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) के एक सम्मानित अधिकारी हैं। उनकी यह कहानी देश के लाखों उन छात्रों के लिए प्रेरणा का स्रोत है जो संसाधनों की कमी या आर्थिक तंगी से जूझ रहे हैं।

**सक्सेस स्टोरी**

### अभावों से भरा बचपन और पढ़ाई का जज्बा

प्रल्हाद मीणा का बचपन बेहद गरीबी और अभावों में बीता। उनके परिवार के पास केवल दो बीघा जमीन थी, जिससे जीवन यापन करना काफी कठिन था। बचपन में ही वे जानवर चराने के साथ-साथ अपनी पढ़ाई भी जारी रखते थे। कठिन परिस्थितियों के बावजूद उन्होंने कभी शिक्षा का महत्व कम नहीं होने दिया और परिस्थितियों के सामने घुटने टेकने के बजाय उन्हें अपनी ताकत बनाया।

### गैंगमैन की पहली नौकरी से शुरुआत

आर्थिक स्थिति सुधारने के लिए उन्होंने शुरुआत में रेलवे में गैंगमैन (ग्रुप डी) की नौकरी चुनी, जहां उनका काम रेल पटरियों की देखभाल और मरम्मत करना था। ओडिशा के भुवनेश्वर में रेलवे में ड्यूटी करते हुए भी उनके मन में हमेशा कुछ बड़ा हासिल करने का जुनून था। उन्होंने इस नौकरी को मजबूरी न मानकर आगे बढ़ने की सीढ़ी बनाया। बाद में वे दिल्ली में असिस्टेंट सेक्शन ऑफिसर के पद पर भी कार्यरत रहे।

### ८ घंटे की ड्यूटी के साथ बिना कोचिंग की तैयारी

जब प्रल्हाद ने देश की सबसे कठिन मानी जाने वाली यूपीएससी परीक्षा देने का फैसला किया, तब उनके पास न तो महंगे संसाधन थे और न ही किसी कोचिंग का सहारा। उन्होंने ८ से ९ घंटे की नौकरी के साथ समय का बेहतरीन टाइम मैनेजमेंट किया। वे रोजाना सुबह ४ बजे उठकर पढ़ाई करते थे, ऑफिस के लंच ब्रेक में पढ़ते थे और मेट्रो में सफर के दौरान अखबार पढ़कर करंट अफेयर्स की तैयारी करते थे।

### ३ असफलताएं भी नहीं डिगा सकीं हौसला

प्रल्हाद मीणा को वर्ष २०१३ और २०१४ में यूपीएससी की मुख्य परीक्षा देने का अवसर प्राप्त हुआ। हालांकि, वर्ष २०१५ की प्रारंभिक परीक्षा में उन्हें सफलता हासिल नहीं हो सकी। संघर्ष के इस रास्ते में प्रह्लाद को लगातार तीन बार असफलता का सामना करना पड़ा और लोगों ने उनका मजाक भी उड़ाया। लेकिन उन्होंने हार मानने की बजाय अपनी कमियों को दूर किया। उन्होंने निबंध लेखन और अपने वैकल्पिक विषय 'हिंदी साहित्य' को मजबूत बनाया। अपनी असफलताओं को उन्होंने सबसे बड़ा शिक्षक माना और दुगनी मेहनत से फिर खड़े हुए।

### २०१७ में पूरा हुआ आयपीएस बनने का सपना

प्रल्हाद मीणा की कड़ी मेहनत, धैर्य और निरंतरता का परिणाम साल २०१७ में मिला, जब उन्होंने यूपीएससी परीक्षा रैंक ९५१ के साथ पास कर आयपीएस बनने का अपना सपना पूरा कर लिया। सबसे खास बात यह रही कि जिस ओडिशा राज्य में वे कभी रेलवे गैंगमैन की नौकरी करते थे, आयपीएस बनने के बाद उन्हें उसी ओडिशा कैडर में सेवा देने का अवसर मिला।
छात्रों को संदेश देते हुए आयपीएस प्रल्हाद मीणा कहते हैं कि बहुत सारी किताबें पढ़ने की जगह सीमित किताबों का बार-बार रिवीजन करना चाहिए और किसी भी परिस्थिति में अपने आत्मविश्वास को कभी खोने नहीं देना चाहिए।

# पंपकिनपासून चिया सीड्सपर्यंत; 'हे' ६ सीड्स खाण्याची योग्य पद्धत आणि फायदे जाणून घ्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



पंपकिन सीड्समध्ये प्रोटीन, फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिड, मॅग्नेशियम आणि झिंक यांसारखे पोषक घटक असतात. हे सीड्स हलके भाजून खाण्याचा सल्ला दिला जातो.

**अळशीच्या बिया :** अळशी म्हणजेच फ्लॅक्स सीड्समध्ये अनेक पोषक घटक असतात. याचा अधिक फायदा मिळवण्यासाठी अलसीचे बी पूर्ण खाण्याऐवजी बारीक वाटून किंवा पावडर करून खावे, असे न्यूट्रिशनिस्टने सांगितले आहे.

**चिया सीड्स :** चिया सीड्समध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते. हे सीड्स खाण्यापूर्वी किमान ३ ते ४ तास पाण्यात भिजवून ठेवावेत. त्यानंतर त्यांचे सेवन करणे योग्य ठरते.

**तीळ :** तिळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे हाडांच्या आरोग्यासाठी त्याचा आहारात समावेश करता येतो. तीळ तडका देऊन किंवा भाजून खाल्ल्यास त्यातील हेल्दी फॅट्स आणि पोषक घटक मिळण्यास मदत होते.

**हलीमच्या बिया :** हलीम किंवा अळीवाच्या बियांमध्ये लोहाचे प्रमाण चांगले असते. त्यांचे सेवन करण्यासाठी बिया रात्रभर पाण्यात भिजवून ठेवाव्यात आणि सकाळी त्यांचे सेवन करावे, असा सल्ला देण्यात आला आहे.

**सूर्यफुलाच्या बिया :** सूर्यफुलाच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रोटीन आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात. या बिया कच्च्या स्वरूपातही खाता येतात. व्हिटॅमिन ई त्वचा आणि केसांसाठी उपयुक्त मानले जाते.



# दही जास्त आंबट होण्यापासून वाचविण्यासाठी काय कराल?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दही जास्त आंबट होऊ नये म्हणून दुधाचे तापमान नियंत्रित ठेवा, स्टार्टर कमी वापरा आणि ते घट्ट झाल्यावर लगेच फ्रीजमध्ये ठेवा. उन्हाळ्यात जिवाणूंची झपाट्याने वाढ होते. त्यामुळे योग्य हाताळणी अत्यंत महत्त्वाची आहे. दही घट्ट होत असताना त्यात कच्च्या नारळाचा लहान तुकडा टाकल्यास ते खूप लवकर आंबट होण्यापासून वाचते. जर तुम्हाला दही जास्त काळ साठवायचे असेल, तर चिमूटभर मीठ घातल्याने जिवाणूंची वाढ मंदावते. दह्यावर थोडे साधे पाणी टाकल्याने त्याचा आंबटपणा आणि ताजेपणा टिकून राहण्यासही मदत होते.

# आरोग्यासाठी 'हे' ५ कुकिंग ऑईल सर्वांत हानिकारक!

## तुम्हीही हेच जेवणात वापरता का? डॉ. साळुंकेंनी सांगितला धोका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अनेकदा लोकांना वाटते की बाहेरचे अन्न खाल्ल्याने शरीराला इजा पोहोचू शकते, पण तुम्हाला माहीत आहे का की तुमच्या किचनमध्ये ठेवलेले हे पाच तेल देखील असंख्य गंभीर आजारांना आयते निमंत्रण देऊ शकते. होय, तुम्ही अगदी बरोबर वाचले आहे. जनरल फिजिशियन, कन्सल्टंट फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट डॉ. शालिनीसिंग साळुंके यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरून याच पाच तेलांबाबतची माहिती दिली आहे. स्वयंपाकासाठी कोणते पाच कुकिंग ऑइल अजिबात वापरू नये, याबाबत डॉ. साळुंके यांच्याकडून माहिती जाणून घेऊया.

**आरोग्यासाठी सर्वात हानिकारक तेल कोणते?**

**१) वनस्पती तूप (डालडा) :** डॉक्टर शालिनी यांच्या मते वनस्पती तुपात ट्रान्सफॅटचे प्रमाण खूप जास्त आढळते. जे हृदयाशी संबंधित आजारांचे मोठे कारण बनू शकते. हृदयाशी संबंधित समस्यांचा सामना करणाऱ्या लोकांनी तुपाचे सेवन करणे टाळावे.

**२) वारंवार गरम केलेले तेल :** अनेकदा लोक एकच तेल वारंवार गरम करून वापरतात. पण तुम्हाला माहीत आहे का हे तुमच्या आरोग्याला किती नुकसान पोहोचवत आहे? डॉक्टर शालिनी यांचे म्हणणे आहे की वारंवार गरम केलेले तेल वापरल्याने कॅन्सरचा धोका वाढू शकतो.

**३) पाम ऑइल :** पाकीटबंद पदार्थांमध्ये पाम ऑइलचा सर्वाधिक वापर केला जातो. अशा स्थितीत जर तुम्हाला पाकीटबंद पदार्थ खाण्याची आवड असेल तर आजच तुमची सवय बदला; कारण यामुळे तुमच्या शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वेगाने वाढवू शकते.

**४) सोयाबीन तेल :** डॉक्टर शालिनी यांच्या मते, जर तुम्ही सोयाबीनच्या तेलाचे सेवन जास्त किंवा वारंवार करत असाल तर यामध्ये आढळणारे ओमेगा-६ फॅटी ॲसिड शिरांमध्ये जमा होणाऱ्या खराब कोलेस्टेरॉलचा धोका वाढवू शकते.

**५) कोणतेही रिफाइंड ऑइल :** डॉक्टर शालिनी यांच्या मते कोणतेही रिफाइंड ऑइल आरोग्यासाठी चांगले नाही. त्यामुळे याचा वापर करणे टाळले पाहिजे.

# सोलर नाही आता घरावर लावा 'नॅनो' पवनचक्की...

## रात्रीही तयार होईल वीज, किंमत-युनिट प्रॉडक्शनची ए टू झेड माहिती!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




घरामध्येच वीज तयार करण्यासाठी फक्त सोलार पॅनल हा एकमेव पर्याय आहे का? आतापर्यंत तुम्ही याचे उत्तर हो असेच द्याल, पण आता घराच्या छतावर तुम्ही पवन चक्कीही बसवू शकता.
सोलर पॅनल कमी उन्हात किंवा रात्रीच्या वेळी वीज निर्माण करू शकत नाही, पण आता स्काय विंड एनर्जी या कंपनीने मायक्रो विंड टर्बाईन म्हणजेच छोटी पवनचक्की तयार केली आहे, जी घराच्या छतावर लावून तुम्ही वीज निर्माण करू शकता.

आतापर्यंत पवनचया या खूप मोठ्या असायच्या पण आता मायक्रो विंड टर्बाईन इतकी छोटी आहे की ती तुम्ही घराच्या छतावरही लावू शकता, यासाठी फार जागाही लागत नाही, त्यामुळे जिथे सोलर पॅनलला नवा पर्याय समोर आला आहे. मायक्रो विंड टर्बाईन अशावेळीही वीज निर्माण करू शकते, ज्यावेळी सोलर पॅनल काम करत नाही. घराच्या छतावर जागा कमी असेल तरीही मायक्रो विंड टर्बाईन इन्स्टॉल करता येते, कारण एका पोलच्या मदतीने छताच्या वर जास्त उंचीवर मायक्रो विंड टर्बाईन इन्स्टॉल केले जाते, कारण जलद हवेचा फायदा उचलता येईल. मायक्रो विंड टर्बाईन मोठ्या पवनचक्कीचं कॉम्पॅक्ट व्हर्जन आहे, ज्यातून हवेमुळे घरगुती वापरासाठी वीज निर्माण केली जाऊ शकते. शेती आणि ऑफ ग्रीड जागांवर या छोट्या पवनचया अगदी सहज इन्स्टॉल करता येतात. वादळ किंवा जोरदार वारा असला तरीही सिस्टिममध्ये खास डंप लोड आणि कंट्रोलर लावण्यात आला आहे, त्यामुळे पवनचक्की सुरक्षित राहते. हवेमुळे टर्बाईनच्या छोट्या एयरोडायनामिक ब्लेड्स हवेला कापून फिरत असतात, यात असलेला जनरेटर वीज निर्माण करतो आणि इनव्हर्टरच्या माध्यमातून ही वीज घरातील इलेक्ट्रिकच्या वस्तूंसाठी वापरली जाऊ शकते. ऊन नसले आणि रात्र असली तरीही पवनचक्कीमधून वीज निर्माण होते.
योग्य हवा मिळाली तर सिंगल टर्बाईन एक हजार वॉट म्हणजेच १ किलोवॉटपर्यंत पॉवर जनरेट केली जाऊ शकते. खूप हवेच्या ठिकाणी टर्बाईन लावले तर वर्षाला ६१५ किलोवॉटपर्यंतही वीज निर्माण होऊ शकते.
सोलर पॅनल आणि मायक्रो विंड टर्बाईन यांचे फायदे आणि तोटेही आहेत. सोलर पॅनल छतावर खूप जागा घेतात, पण मायक्रो विंड टर्बाईनला कमी जागा लागते. तसेच रात्रीच्या वेळीही टर्बाईनमधून वीज निर्माण केली जाऊ शकते. पण शहरी भागात जिथे उंच इमारती आहेत तिथे हवेचा प्रवाह कमी असतो, तिथे टर्बाईनमधून वीजनिर्मिती करण्यात अडचणी येतात.

मायक्रो टर्बाईनची ३००-५०० वॉटची किंमत ४० ते ७५ हजारांच्या रेंजमध्ये आहे. तर १ किलोवॉट ते ३ किलोवॉटची किंमत १.५ लाख ते ५ लाख आणि ५ किलोवॉट ते १० किलोवॉटची किंमत ६ ते १८ लाख आहे. सध्या सरकारकडून सोलार पॅनल बसविल्यानंतर सबसिडी मिळत आहे, पण मायक्रो विंड टर्बाईनसाठी मात्र कोणतीही सबसिडी नाही.

# कुत्रा जेव्हा तुमच्याकडे पाहतो, त्यावेळी त्याच्या डोक्यात काय चालते?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



मानवी चेहऱ्यावरील आनंद, राग, भीती आणि दुःख या मानवीय भावनांवर कुत्र्याच्या मेंदूची प्रतिक्रियाही बदलते. कुत्रा आपल्याकडे एकटक पाहतो, त्यावेळी त्याच्या डोक्यात काय चालते? शास्त्रज्ञांनी त्यावर उत्तर शोधले आहे. काय आहे याविषयीचे संशोधन?
आपला कुत्रा फार इमानी आहे. त्याला आपल्या मनातील अचूक कळते. आपल्या चेहऱ्याचे हावभाव तो ओळखतो. आपण दुःखी असलो की तो समजतो. आपल्या कुत्र्याला आपली अस्वस्थता जाणवते असे अनेक कुत्रा मालकांना वाटते. पण खरोखर असे असते का? मानवी चेहरा कुत्रा वाचतो का? मानवाचे दुःख, भीती, राग, आनंद या भावनांनुसार तो प्रतिक्रिया देतो. त्याची प्रतिक्रिया बोलकी नसली तरी आपल्या मनाची घालमेल त्याला जाणवते असा आपला जो समज आहे, त्यावर एक संशोधन समोर आले आहे. दि. १० ऑगस्ट रोजी iScience च्या सेल प्रेसच्या जर्नलमध्ये एक नवीन संशोधन प्रकाशित झाले आहे. मानवी चेहऱ्यावरील आनंद, राग, भीती आणि दुःख या मानवीय भावनांवर कुत्र्याच्या मेंदूची प्रतिक्रियाही बदलते, असा या संशोधनाचा घोषवारा आहे.

### असे झाले संशोधन

संशोधकांनी पाळीव कुत्र्यांचा मेंदू स्कॅन केला. कुत्र्यांना वेगवेगळ्या भावना व्यक्त करणारी मानवी चेहरे दाखवले गेले. अर्थात छायाचित्र दाखवली गेली. कुत्रांनी मानवी चेहऱ्यावरील हावभावानुसार काय प्रतिक्रिया दिली. त्यांच्या मेंदूमध्ये काय सक्रियता दिसली, हे टिपण्यात आले. तेव्हा संशोधकांना धक्काच बसला. कारण कुत्रा हा केवळ चांगला अथवा वाईट इतकेच वर्गीकरण करत नाही. यापूर्वीच्या संशोधनात कुत्रा आनंदी चेहरा आणि दुःखी, नकारात्मक चेहरा ओळखू शकतो. त्यातील फरक समजू शकतो हे दिसून आले होते. आताच्या संशोधनातून मानवीय भावना विशेषतः राग, भीती आणि दुःख यांची सरमिसळही त्याला जाणवते आणि त्याच्या मेंदूवरही त्याचा परिणाम होतो असे संशोधनातून समोर आले आहे.

### संशोधनातून काय आढळले?

घाबरलेल्या चेहऱ्यांकडे पाहताना, रागावलेल्या, कष्टी चेहऱ्यांकडे पाहताना आणि हसऱ्या चेहऱ्यांकडे पाहताना कुत्र्याच्या मेंदूमध्ये दिसलेली सक्रियता वेगवेगळी होती. याचा अर्थ या सर्व भावभावनांमध्ये कुत्रे फरक करू शकतात. ते केवळ सकारात्मक आणि नकारात्मक इतकाच मर्यादीत भेद करत नाहीत. तर त्यांना मानवी भाव-भावनांची जाणीव होते. त्यांना मानवी भावनाही कळतात असा शास्त्रज्ञांचा दावा यामाध्यमातून समोर आला आहे.

### मालकाची घालमेल कुत्रा ओळखतो

संशोधक राऊल हर्नांडेझ-पेरेझ आण लॉरा कुआया यांनी न्यूजवीकला या संशोधनाची माहिती दिली. त्यांच्या मते, कुत्र्यांमध्ये मानवी भावना ओळखण्याचीच नाही तर त्या भावनांमध्ये फरक करण्याची क्षमता असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. आनंदी चेहरा, दुःखी चेहरा इतकेच ते ओळखत नाही. तर मालकाच्या मनातील घालमेल, त्याच्या चिंता, त्याची मनस्थिती याचा अचूक वेध कुत्रा घेऊ शकतो. त्याला अबोल भाषाही मालकाच्या चेहऱ्यावरून समजते, हे या संशोधनातून समोर आले आहे. मानवाच्या भीतीशी संबंधित संकेत कुत्रे हे वेगवेगळ्या संवेदनांमधून टिपतात. इतकेच नाही तर मानवी चेहऱ्यावरील सुक्ष्म बदल ओळखण्यातही कुत्रे माहीर असतात यावर शिक्कामोर्तब झाले आहे. हे मोठे संशोधन म्हणावे लागेल.
कुत्र्यांच्या मेंदूचा अभ्यास करून मानवांशी असलेली त्यांची विलक्षण सामाजिक आणि भावनिक समज या संशोधनातून समोर आली आहे. गेल्या कित्येक हजार वर्षात कुत्र्याचा मानवी वस्तीसोबत अव्याहत प्रवास सुरू आहे. या इतक्या वर्षाच्या काळात मानवी पिढ्यांसोबत कुत्र्यांच्या पिढ्याही उन्नत झाल्या आहेत. त्यांना मानवी स्वभावाचे गुण हेरता येतात हे या संशोधनातून समोर आले आहे. मानवाचा एक चांगला मित्र म्हणूनही कुत्रा ओळखल्या जातो. अनेकांच्या घरात कुत्रे असतात. अनेक मालकांचा पाळीव कुत्र्यांवर जीव असतो. व्हिडिओ कॉलवर सुद्धा ते प्रतिक्रिया नोंदवतात. या नवीन संशोधनातून मानवी चेहऱ्यावरील सुक्ष्म बदलच नाही तर मनाची घालमेल ओळखण्यात कुत्रे पारंगत असल्याचे समोर आले आहे.

मंगल पान

# कानबाई मातेची थोडक्यात माहिती



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कान्हदेश (कान्हाचा देश) पुढे अपभ्रंश होऊन त्यांचे नामांतर खान्देश असा झाला आहे. "कानबाई" व "रानबाई" या अनुक्रमे राधा व चंद्रावली (रुक्मिणी) देवी आहेत. गुरु गोरक्षनाथ कान्हदेशात आले तेव्हा त्यांनी दोन्ही देवीचे बंधू असून त्यांच्या भक्त असल्याचे स्वीकारले. कानबाई व रानबाई यांचे पूजन अहिर लोक साधारणतः चार हजार वर्षापासून करत असावेत असा अंदाज आहे. अहिर हे कृष्णवंशी असून गो-पालन हा त्यांचा मुख्य व्यवसाय. राधा व चंद्रावली या अहिर कुळात जन्मलेल्या असल्यामुळे त्यांची पूजा केली जाते व त्यांना कानबाई व रानबाई म्हणतात. अहिराणी ही अहिरांची मूळ भाषा. या भाषेचा इतिहासही पाच हजार वर्षापूर्वीचा आहे. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात बळसाणे गावातील बार देवी मंदिर हे अहिर वंशीयांनी स्थापित केलेले आहे. इथे राधा (कानबाई) व चंद्रावली (रानबाई) यांना त्यांच्या सखींसहित पूजले जाते. हे बळसाणे गाव म्हणजे उत्तर प्रदेशातील वृज मंडळातील बरसाना (राधाचं गाव) गावाचे प्रति रूप होय. कानबाई म्हणजे कृष्णाची प्रिय सखी श्रीमती राधिका होय आणि रानबाई म्हणजे कृष्णाची प्रिय राणी रूक्मिणी अर्थात वृंदावनातील चंद्रावली होय. कानबाईना रोट म्हणजे खान्देशाची दिवाळी. श्रावणातल्या नागपंचमीनंतरच्या पहिल्या रविवारी कानबाई आणि रानबाईचा उत्सव खान्देशात उत्साहाने साजरा होतो. कानबाईचे नारळ मुख्यतः पूर्वापार चालत आलेले असते किंवा परनून आणलेले असते. शनिवार, रविवार आणि सोमवार असे तीन दिवस हा सण साजरा करण्यात येतो. गावाला या तीन दिवसात जत्रेचे स्वरूप येते. कानबाई ची मुख्य सेविका असते तिला गवरणी (गवळणी) म्हणतात. ही गवळणी म्हणजे राधाच्या मुख्य सेविका ललिता आणि विशाखा यांचे प्रतीक समजतात.



**माँ अन्नपूर्णा की प्रतिमा को ध्यान से देखें–उनके हाथों में पूजा से जुड़ी चीजें भी उनके स्वरूप का हिस्सा हैं। वाराणसी के माँ अन्नपूर्णा मंदिर के गर्भगृह में देवी को एक हाथ में करछी और दूसरे में अन्न का पात्र धारण किए हुए दर्शाया गया है। यह उनके अन्न और पोषण से जुड़े स्वरूप को सीधे दर्शाता है।**

# सायंकाळी घरात तुपाचा अथवा तेलाचा दिवा लावण्याचे महत्त्व :

## एक साधा आणि सकारात्मक विचार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) आपल्या संस्कृतीत सायंकाळी (तिन्हीसांजेला) घरात आणि तुळशीजवळ तुपाचा अथवा तेलाचा दिवा लावण्याची एक अत्यंत सुंदर आणि साधी पद्धत आहे. अनेकदा धावपळीच्या जीवनात आपण या लहानशा गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. पण हा केवळ एक जुना रिवाज नसून, यामागे मानसिक शांती आणि सकारात्मक ऊर्जेचा एक मोठा विचार दडलेला आहे.

२) ज्योतिषशास्त्र आणि वास्तुशास्त्रानुसार सूर्यास्त आणि रात्रीच्या मधला काळ (सायंकाळ) हा निसर्गातील ऊर्जा बदलण्याचा काळ असतो. या वेळेत अंधार वाढू लागतो. ज्याला नैसर्गिकरित्या 'राहू' (उदासीनता, आळस आणि नकारात्मकता) ग्रहाशी जोडले जाते. घरात एक छोटासा तुपाचा अथवा तेलाचा दिवा लावल्याने 'अग्नी तत्त्व' (सूर्य आणि मंगळाचे प्रतीक) जागृत होते आणि घरातील ही नैसर्गिक नकारात्मकता दूर होते.

३) मानसिक दृष्टिकोनातून विचार केल्यास दिव्याचा शांत आणि उबदार प्रकाश आपल्या मनाला एक वेगळीच स्थिरता देतो. दिवसभराचा कामाचा थकवा, ताणतणाव आणि चिडचिड कमी करण्यासाठी दिव्याची ही सात्विक ऊर्जा खूप मदत करते. ज्या घरात संध्याकाळी शांतता असते आणि प्रकाश असतो, तिथे नेहमी प्रसन्नता टिकून राहते आणि कुटुंबातील संवाद सुधारतो.

४) हा एक अतिशय सोपा आणि मनाला समाधान देणारा बदल आहे. रोज सायंकाळी देवघरात, तुळशीजवळ किंवा उंबरठ्याजवळ एक साध्या तेलाचा किंवा तुपाचा दिवा नक्की लावा. या छोट्याशा कृतीमुळे घरातील वातावरण शुद्ध होते आणि घरामध्ये एक प्रकारची नैसर्गिक सकारात्मकता कायम राहते.


**। शुभम भवतु ।**

# 'या' ३ गुणांच्या स्त्रिया ठरतात घरची लक्ष्मी!

## लग्नानंतर उजळते नवऱ्याचे नशीब, होतो सुख-समृद्धीचा वर्षाव!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आचार्य चाणक्य यांनी महिलांच्या अशा ३ विशेष गुणांचा उल्लेख केला आहे, जे त्यांच्या पतीसाठी आणि संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत शुभ आणि भाग्यशाली ठरतात. चाणक्य नीतीनुसार जेव्हा एखादी गुणी आणि संस्कारी स्त्री घरात वधू म्हणून प्रवेश करते तेव्हा ती केवळ एका कुटुंबाशी जोडली जात नाही, तर त्या घराच्या भाग्याचे दरवाजे उघडते. आचार्य चाणक्य यांनी महिलांच्या अशा ३ विशेष गुणांचा उल्लेख केला आहे, जे त्यांच्या पतीसाठी आणि संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत शुभ आणि भाग्यशाली ठरतात. येथे चाणक्य नीतीमध्ये सांगितलेले बुद्धिमत्ता आणि संस्कारी स्त्रीचे ३ प्रमुख गुण सविस्तर दिले आहेत.



### सुख-समृद्धी आणि संतुलन राखण्याची कला

चाणक्य नीतीनुसार जी स्त्री कुटुंबात सुख-शांती टिकवून ठेवण्यासोबतच आपल्या इच्छा आणि प्राधान्यक्रमांमध्ये योग्य संतुलन राखणे जाणते, ती तिच्या पतीसाठी अत्यंत भाग्यवान ठरते. अशी स्त्री घरात आनंद आणते आणि सर्व कौटुंबिक नातेसंबंधांना एकत्र बांधून ठेवते. तिच्या आगमनाने घरात सकारात्मक उर्जेचा संचार होतो आणि दाम्पत्य जीवन नेहमी सुखमय राहते.

### उत्तम संस्कार आणि योग्य-अयोग्य समजण्याची क्षमता

कोणत्याही स्त्रीचे उत्तम संस्कार हे ती सुशिक्षित आणि समंजस असल्याचे सर्वांत मोठे प्रमाण असतात. संस्कारी स्त्रीमध्ये काय योग्य आणि काय अयोग्य याची अचूक समज असते. कठीण प्रसंगातही ती घाबरून न जाता आपल्या पतीच्या आणि कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहुन संकटावेळी पतीचे ढाल बनणारी पत्नी ज्या पुरुषाला मिळते, त्याचे भाग्य उजळणे निश्चित मानले जाते.

### धर्म आणि नीतीचे पालन

आचार्य चाणक्य यांच्या मते जी महिला धर्म, नीती आणि सदाचाराच्या मार्गावर चालते, तिचे घर नेहमी धन-धान्य आणि शांततेने समृद्ध राहते. अशा स्त्रीचा पती अत्यंत भाग्यवान असतो. धर्माचे आणि नैतिकतेचे पालन करणारी स्त्री घरात सकारात्मक वातावरणनिर्मिती करते. ज्यामुळे संपूर्ण कुटुंबाला आयुष्यात सुख, समृद्धी आणि मान-सन्मान प्राप्त होतो.

# दशामाते कोण आहे ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रहाची वाईट दशा दूर करून प्रत्येक प्रकारचे सुख, शांती आणि समृद्धी देणारी दशामाते आहे.

माते आद्यशक्ती म्हणा की दुर्गा म्हणा, शास्त्रात दुर्गाच्या नावाचे नऊ देवी प्रसिद्ध आहेत.

या कलियुगात मनुष्य अनेक दुःखांनी पिडलेला आहे. माणसाचे दुःख दूर करण्यासाठी देवी वेगवेगळी रूपे घेऊन प्रकट होते आणि भक्तांचे दुःख दूर करते.

मनुष्य जीवनावर वेगवेगळ्या ग्रहांची दशा चालत असते. शनी, मंगळ वगैरे ग्रहांची निर्बल ग्रहदशा चालू असते. अशा निर्बल ग्रहदशेत मनुष्य निरनिराळे दुःख अनुभवतो. कुणाला मुलबाळ नाही, कुणाला मोठे आजारपण येत असते, कुणाला कुटुंबसुख प्राप्त होत नाही, पती-पत्नी यांच्यामध्ये मनमेळ होत नाही. कुणाचे लग्न होत नाही. हे सगळं वाईट ग्रहदशेमुळे होत असते.

मनुष्याची अशी वाईट दशा दूर करण्यासाठी दशामाते वेगवेगळ्या रूपात प्रकट होऊन भक्तांचे दुःख दूर करते. म्हणूनच या दशामातेचे फलदायी असे शुद्ध आणि खरे व्रत करणाऱ्यांना दशामाते मनोवाच्छीत फळ देते.

# श्रावण मास : उपासनेतून परिवर्तनाकडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण मास आला की वातावरणात एक वेगळेच मांगल्य निर्माण होते. उपवास, व्रत-वैकल्ये, पूजा-अर्चा, अभिषेक, हरिपाठ, नामस्मरण, श्रावणी, देवदर्शन अशा विविध धार्मिक उपक्रमांनी हा महिना भक्तिमय होऊन जातो. भारतीय संस्कृतीने श्रावणाला विशेष पावित्र्य आणि आध्यात्मिक महत्त्व दिले आहे.

मात्र या सर्व उपासनेच्या निमित्ताने आपण स्वतःला एक मूलभूत प्रश्न विचारायला हवा

### श्रावण का पाळायचा?

काही पदार्थ वर्ज्य करण्यासाठी? उपवास करण्यासाठी? देवाची पूजा करण्यासाठी? की या सर्वांच्या माध्यमातून स्वतःमध्ये काही चांगले परिवर्तन घडवून आणण्यासाठी?

खरे तर उपासना आणि परिवर्तन या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत. उपासना ही प्रक्रिया आहे आणि परिवर्तन हे तिचे फलित आहे. महिनाभर उपासना केली, व्रत-वैकल्ये केली, उपवास केले; पण विचार मात्र पूर्वीसारखेच राहिले, राग तसाच राहिला, अहंकार कमी झाला नाही, निंदा आणि मत्सर कमी झाले नाहीत, वाणीतील कटुता तशीच राहिली आणि व्यवहारातही कोणताही सकारात्मक बदल झाला नाही, तर आपण स्वतःला विचारले पाहिजे. आपण श्रावण पाळतो आहोत की केवळ श्रावणातील विधी पाळतो आहोत?

हा प्रश्न कर्मकांड नाकारण्यासाठी नाही; तर त्यामागील मर्म समजून घेण्यासाठी आहे. पूजा, व्रत, उपवास, अभिषेक, हरिपाठ आणि नामस्मरण हे सर्व श्रद्धेने आणि भक्तिभावाने करूया; पण त्यातून आपल्या जीवनातही मंगल परिवर्तन घडले पाहिजे.

श्रावणात आपण काही पदार्थ वर्ज्य करतो आणि शरीरावर संयम लावतो. मग मनावरही संयम का नको? अभक्ष्य वर्ज्य करताना अशुभ चिंतनही वर्ज्य करूया. निंदेचा उपवास करूया. द्वेषाला उपाशी ठेवूया. मत्सराला खतपाणी घालणे थांबवूया. कटु शब्द ओठांवर येण्यापूर्वीच थांबवण्याचा प्रयत्न करूया. पोटाचा उपवास काही तासांचा असतो; पण मनातील विकारांचा उपवास किती काळ करता येतो, याचाही विचार या श्रावणात करूया. सद्गुरू श्री. वामनराव पै यांचा संदेश आहे. चांगल्या विचारांची जोपासना हीच परमेश्वराची उपासना. परमेश्वराची उपासना देवघरात सुरू व्हावी; पण ती तिथेच थांबू नये. ती मनात उतरावी, वाणीतून व्यक्त व्हावी आणि आपल्या आचरणातून व व्यवहारातून सिद्ध व्हावी.

### शंकरोपासना म्हणजे जीवनोपासना

श्रावण आणि शंकरोपासनेचे नाते अतूट आहे. आपण भगवान शंकराला अभिषेक करतो, बेलपत्र अर्पण करतो, नमस्कार करतो. परंतु भगवान शंकर आणि शिवपरिवाराकडे केवळ पूजेच्या दृष्टीने न पाहता जीवनाच्या दृष्टीने पाहिले, तर त्यातून अनेक सुंदर जीवनसूत्रे आपल्याला मिळतात. भगवान शंकराचे वाहन नंदी, गणपतीचे वाहन उंदीर, कार्तिकेयाचे वाहन मोर, देवीचे सिंह किंवा वाघरूप वाहन आणि शंकराच्या गळ्यातील सर्पनिसर्गाच्या दृष्टीने पाहिले तर यांतील काही जीव परस्परविरोधी आहेत; काही तर भक्ष्य आणि भक्षक आहेत. तरीही कैलासावर सर्वजण शांततेने नांदताना दिसतात. इतकी विसंगती असूनही कैलासावर शांतता आहे. आणि आपल्या घरात? सर्व माणसे. एकमेकांची भाषा समजणारी. प्रेमाची आणि रक्ताची नाती असलेली. तरीही क्षुल्लक मतभेदांमुळे नाती वर्षानुवर्षे दुरावतात. मग खरा प्रश्न मतभेदांचा आहे का? की मतभेद स्वीकारता न येण्याचा आहे? शिवपरिवार आपल्याला एक अत्यंत सुंदर जीवनसूत्र देतो एकमत नसले तरी एकमनाने राहता येते. प्रत्येकाने माझ्यासारखाच विचार केला पाहिजे, माझेच ऐकले पाहिजे आणि माझेच बरोबर मानले पाहिजे, हा आग्रह वाढला की नात्यांतील आनंद कमी होतो. भिन्नता ही समस्या नसते; भिन्नतेचा स्वीकार न होणे ही खरी समस्या असते. भगवान शंकराच्या मस्तकावर गंगा आहे, शिरावर शीतल चंद्र आहे आणि व्यक्तिमत्त्वात विलक्षण स्थैर्य आहे. जणू त्यातून संदेश मिळतो विचार गंगेसारखे निर्मळ, मस्तक चंद्रासारखे शीतल आणि मन शंकरासारखे स्थिर असावे.नंदीची



नजरही स्थिरपणे शिवावर असते. आपली नजर मात्र अनेकदा दुसऱ्याकडे असतेत्याला काय मिळाले, मला काय मिळाले नाही, लोक माझ्याबद्दल काय म्हणतील? नंदी जणू सांगतो दुसऱ्याकडे पाहण्यात आयुष्य घालवू नका; आपल्या ध्येयाकडे पाहा. नंदीला नमस्कार करणे ही श्रद्धा आहे; पण त्याचे स्थैर्य घेऊन मंदिराबाहेर पडणे ही साधना आहे.

अभिषेक बाहेरच नव्हे, आतही भगवान शंकरावर जलाभिषेक जरूर करूया; पण त्याच वेळी आपल्या स्वभावावरही एक अभिषेक घडू द्या रागावर शांततेचा, अहंकारावर नम्रतेचा, द्वेषावर प्रेमाचा, आग्रहावर स्वीकाराचा, आणि अशुभ चिंतनावर शुभ चिंतनाचा.

शिवलिंगावर पाणी वाहिले आणि मनातील राग तसाच राहिला, तर अभिषेक बाहेर झाला; पण तो आत पोहोचला नाही. देवावर पाणी वाहण्याबरोबर मनातील आगही विझली पाहिजे.

तेव्हा कर्मकांडाचे रूपांतर जीवनसंस्कारात होते आणि शंकरोपासना जीवनोपासना बनते.

श्रावणात 'श्रवण'ही घडू दे

परिवर्तन आपोआप घडत नाही. त्यासाठी योग्य विचार मनापर्यंत पोहोचले पाहिजेत. सद्गुरू श्री. वामनराव पै यांनी परमार्थातील प्रगतीसाठी श्रवण, वाचन, चिंतन, साधना आणि गुरुकृपा या महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. आज आपण दिवसभर अनेक गोष्टी ऐकतोबातम्या, चर्चा, सोशल मीडिया, मतमतांतरे. पण प्रत्येक ऐकणे म्हणजे श्रवण नव्हे. जीवनाला योग्य दिशा देणारे विचार ऐकणे, त्यांचे वाचन करणे, त्यावर चिंतन करणे आणि ते साधनेच्या माध्यमातून आचरणात आणणे, ही खरी प्रक्रिया आहे.

श्रवणातून विचार मिळतो. वाचनातून तो स्पष्ट होतो. चिंतनातून तो मनात रुजतो. साधनेतून तो आचरणात उतरतो. आणि गुरुकृपेने त्या प्रवासाला योग्य दिशा मिळते. म्हणून श्रावणाच्या निमित्ताने व्रत-वैकल्यांबरोबर योग्य श्रवणही वाढवूया. हरिपाठ, नामस्मरण, ज्ञानसाधना वर्ग आणि सत्संग यांचा उद्देश केवळ एखादा कार्यक्रम पूर्ण करणे नाही; तर योग्य विचारांचे जीवनात रूपांतर घडवणे हा आहे. मग श्रावणाचा प्रवास केवळ आहारशुद्धीपुरता मर्यादित राहत नाही. तो पुढे जातो

आहारशुद्धी विचारशुद्धी वाणीशुद्धी आचारशुद्धी व्यवहारशुद्धी आणि हाच खऱ्या अर्थाने श्रावणाचा आध्यात्मिक प्रवास आहे.

### 'मी'पासून 'आम्ही'कडे

जीवनविद्येच्या दृष्टीने हा प्रवास केवळ स्वतःपुरता मर्यादित नाही. आपल्याला नामस्मरणाचा लाभ मिळतो, तर आणखी कोणाला त्याच्याशी जोडूया. आपल्याला सत्संगाचा लाभ मिळतो, तर तो आणखी एका कुटुंबापर्यंत पोहोचवूया. आपण विश्वप्रार्थना म्हणतो, तर तिच्यातील विश्वकल्याणाचा भाव आपल्या व्यवहारात उतरवूया. स्वतःचे परिवर्तन ही साधनेची सुरुवात आहे; दुसऱ्याच्या जीवनात मांगल्य निर्माण करणे हा तिचा विस्तार आहे.

म्हणून नामस्मरण, हरिपाठ, उपासना यज्ञ, विश्वप्रार्थना अशा उपक्रमांत स्वतः सहभागी होण्याबरोबरच नवीन व्यक्तींना आणि कुटुंबांना सहभागी करून घेणे हीदेखील श्रावणातील एक सुंदर साधना ठरू शकते.

एका घरातून दुसऱ्या घरात, एका मनातून दुसऱ्या मनात मंगल विचार पोहोचत राहिले पाहिजेत. जीवनविद्येची दृष्टी 'मी'पुरती मर्यादित नाही. ती

व्यक्ती कुटुंब समाज राष्ट्र विश्व अशी विस्तारत जाते. प्रत्येक कृतीमध्ये राष्ट्रहिताचा आणि विश्वकल्याणाचा भाव जागृत झाला, तरच उपासनेला व्यापक अर्थ प्राप्त होतो.

### श्रावण संपल्यावर काय उरणार?

महिना संपेल. उपवास संपतील. व्रत-वैकल्ये संपतील. सण-उत्सव संपतील. आहार पुन्हा पूर्ववत होईल. पण आपणही पूर्वीसारखेच झालो तर? मग श्रावण आला कुठे होता दिनदर्शिकेत की आपल्या जीवनात?

श्रावणाचे फलित केवळ किती उपवास केले यावर मोजू नका. स्वतःला काही प्रश्न विचारूया
किती राग कमी झाला?
किती निंदा कमी झाली?
किती नाती सुधारली?
किती शुभ चिंतन वाढले?
किती कटुता कमी झाली?
आणि आपल्या माध्यमातून किती जीवनांमध्ये मांगल्य वाढले? याचाही हिशेब करूया.

उपासनेतून परिवर्तनाकडे म्हणून पुन्हा तोच प्रश्न श्रावण का पाळायचा?
फक्त उपवासासाठी नाही.
फक्त व्रत-वैकल्यांसाठी नाही.
फक्त अभिषेकासाठी नाही.
उपासनेतून परिवर्तनासाठी.
श्रवणातून योग्य विचारांसाठी.
चिंतनातून त्या विचारांच्या दृढतेसाठी.

साधनेतून त्या विचारांच्या आचरणासाठी. स्वतःच्या उन्नयनातून कुटुंबातील सुसंवादासाठी आणि त्या मांगल्याचा विस्तार समाज, राष्ट्र आणि विश्वापर्यंत करण्यासाठी. देवाची पूजा जरूर करूया; पण देवत्व आपल्या जीवनात प्रकट करूया. श्रावण एका महिन्यापुरता पाळायचा नाही. श्रावणात स्वतःला असे घडवायचे, की त्याचे मांगल्य पुढचे अकरा महिने आपल्या विचारांत, वाणीत, आचरणात आणि व्यवहारात दिसत राहावे. तेव्हा आपण केवळ 'श्रावण पाळला' असे म्हणणार नाही; तर अभिमानाने म्हणू शकू

**'श्रावणाने आपल्याला घडवले!'**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**